# महाराष्ट्रातील लोकसंख्येचे प्रश्न

**डॉ.रामनाथ पवार**

समाजशास्त्र विभाग, मिलिंद कला महाविद्यालय, औरंगाबाद.

**प्रस्तावना: -**

भारतीय संघराज्याच्या २८ घटकराज्यांपैकी एक असलेले राज्य म्हणुन महाराष्ट्राची ओळख आहे महाराष्ट्र राज्याची निर्मीती १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्र हा आज प्रचलित असलेला शब्द कोठून व केव्हा आला याबाबत विचारवंतांमध्ये मतभेद आहेत. महाभारतातील देशांच्या यादीत विदर्भ, अश्मक, रक्तवाहीक, पांडुराष्ट्र, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अपरान्त, कोकण इत्यादी देशांचा उल्लेख आहे.

अभ्यासकांच्या मते, महाराष्ट्र या नावाचा उल्लेख सातवाहनाच्या काळानंतर सुरु झाला असावा. मराठी या शब्दाचा उल्लेख सा-तवाहनांच्या शिलालेखात व काही नाण्यांवर आढळतो. तसेच सातवाहन राजा हाल याने लिहिलेली 'गाथा सप्तशती' ज्या बोलीभाषेत लिहिली तीच प्राकृत भाषा म्हणजे महाराष्ट्री मराठी होय. इतिहासकार पा. वा. काणे यांनी 'महान राष्ट्र ते महाराष्ट्र' अशी संकल्पना स्पष्ट केली आहे. तर जॉर्ज विल्सन यांनी महाराष्ट्र = महार + राष्ट्र अशी या शब्दाची फोड केली आहे. महार लोक रहात असलेले ठिकाण म्हणजे महाराष्ट्र असे सुचविले आहे. इतिहासाचार्य राजवाड्यांच्या मते, मल्ल लोकांचे राष्ट्र ते महाराष्ट्र होय. काही विचारवंतांनी मराठ्यांचे राज्य ते महाराष्ट्र अशीही संकल्पना मांडली आहे.

या राज्याचा भौगोलिक आकार त्रिकोणाकृती असुन दक्षिणेकडे चिंचोळा तर उत्तरेकडे रुंद होत गेलेला आहे. महाराष्ट्रात एकुण ३५ जिल्हे असुन प्रशासकीय सुविधेसाठी ते कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपुर या सहा महसुली विभागात वि-भागले आहेत महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रफळ ३,०७,७६२ चौ.कि.मी. असुन ते भारताच्या एकुण क्षेत्रफळाच्या ९.३६% इतके आहे. म-हाराष्ट्राची पुर्व-पश्चिम लांबी ८०० कि.मी. तर दक्षिण–उत्तर रुंदी ७२० कि.मी. आहे. महाराष्ट्राला ७२० कि.मी. लांबीचा सागर किनारा लाभला आहे.

भुक्षेत्रफळाच्या व लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. नुकत्याच इ.स. २०११ मध्ये झाल-ेल्या १५ व्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकुण लोकसंख्या ११,२३,७२,९७२ इतकी आहे. भारतातील एकुण लोकसंख्येच्या ९.२३% लोक महाराष्ट्रात राहतात. राज्याच्या लोकसंख्येची घनता ३६५ एवढी आहे. तर लिंग गुणोत्तर ९२५ इतके आहे. महाराष्ट्रातील एकुण साक्षरतेचे प्रमाण ८२.००% आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरता ८६.०२% तर स्त्री साक्षरता ६७.०५% एवढी आहे. महाराष्ट्राच्या एकुण लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण ४८.००% आहे बाललिंग गुणोत्तर ८८३ आहे. सर्वात कमी बाललिंग गुणोत्तर बीड जिल्हयात ८०१ आहे. इ.स. २००१ च्या जनगणनेच्या तुलनेत २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या लोकसंख्येची दशवार्षिक वाढ १६% एवढी आहे.

स्थानिक प्रशासनासाठी राज्याच्या ग्रामीण भागात ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या, व २७,९०६ ग्रामपंचायती आहेत, तर नागरी भागात २६ महानगरपालिका, २२९ नगरपरिषदा, ७ नगरपंचायती व ७ कटक मंडळे आहेत. महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी म्हणुन ओळखली जाते.

**संशोधनाची उदिष्टे: -**

१. महाराष्ट्रातील लोकसंख्यावाढीची कारणे शोधणे.

२. महाराष्ट्रातील शैक्षणिक सोयी-सुविधांचा आढावा घेणे.

३. महाराष्ट्रातील बेरोजगारीचा आढावा घेणे.

४. राज्यातील सामाजिक-आर्थिक विकासाची गती अभ्यासणे.

५. राज्यातील लोकसंख्यावाढ नियंत्रण व कुंटुंब कल्याण कार्यक्रमाचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत शोध-निबंध तयार करण्यासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, दैनिक वृतपत्रे, शासकिय अहवाल व इतर प्रकाशित साहित्याचा उपयोग केला आहे.

**राज्यातील लोकसंख्येच्या समस्या:-**

भारतात लोकसंख्येच्या ज्या समस्या आहेत त्या समस्यांबरोबरच आणखी काही समस्या महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या पहावयास मिळतात. लोकसंख्येच्या समस्या पाहण्याअगोदर आपण लोकसंख्येची संकल्पना जाणुन घेऊत.

मानवी समाज आणि लोकसंख्या यांचा सुरुवातीपासुनच घनिष्ठ संबंध आहे. प्राचीन इतिहासात लोकसंख्येच्या संबंधी माहिती मिळते. कौटील्याने लिहिलेल्या ‘अर्थशास्त्र’ या ग्रंथात तत्कालीन लोकसंख्येचा व शेतीचा संबंध कसा होता याचे विवेचन केले आहे. अकबराच्या काळात अबुल फजल याने लिहिलेल्या ‘ऐने अकबरी’ या ग्रंथात लोकसंख्या, उघोगधंदे, संपत्ती इत्यादी विषयाचे विवेचन आढळते. लोकसंख्येची माहिती असल्याशिवाय कोणत्याही समाजात राहणाऱ्या लोकांना त्यांच्या काय गरजा आहेत, त्या कशा पुर्ण कराव्यात हे समजणारच नाही. त्यामुळे जेथे लोक राहतात तेथील लोकसंख्या कशी आहे हे जाणुन घेतल्याशिवाय विकास अशक्य आहे.

लोकसंख्या अभ्यासात प्रजनन, बाळंतपण, बालसंगोपन, बाळाचे आरोग्य, बालमृत्युचे प्रमाण, आरोग्य-निवारा, आहार, कुपोषण, रोगीष्टता, गरिबी, बेकारी, इत्यादी घटकांचाही विचार केला जातो. भारतातील लोकसंख्या वृद्धीचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की, ब्रिटिशांच्या काळात इ.स. १८७२ साली पहिली जनगणना झाली, त्यानंतर प्रत्येक दहा वर्षानी भारताची जनगणना केली जात आहे. नुकत्याच झालेल्या इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१,०१,९३,४२२ एवढी आहे. देशाच्या या लोकसंख्येत महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ११,२३,७२,९७२ एवढी आहे. भारत देशाचा लोकसंख्येच्या बाबतीत जगात दुसरा क्रमांक लागतो तर महाराष्ट्राचाही लोकसंख्येच्या बाबतीत देशात दुसरा क्रमांक लागतो. यावरुन आपल्या लक्षात येईलच की महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या समस्या किती असतील?

सद्यस्थितीत महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्व लोकसंख्येला अन्न, वस्त्र, निवारा या मुलभुत गरजाही पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. महाराष्ट्रातील जनता गरीबी, दारिद्रय, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, हुंड्याची प्रथा, बालविवाह, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, स्त्रियांच्या समस्या अशा विविध समस्यांना तोंड देत आहे.

महाराष्ट्रातील बहुतांश लोकसंख्या शेतीवर अवलंबुन आहे. परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ सातत्याने पडतो. त्यामुळे शेतीत होणाऱ्या अन्नधान्याच्या उत्पादनावर त्याचा विपरित परिणाम होतो. शेतकरी शेतीत अन्नधान्याच्या उत्पादनासाठी मोठ्या किंमतीची बी-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशंकाचा वापर करतात. परंतु त्या तुलनेत अन्नधान्याचे उत्पादन न झाल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. परिणामी महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाड्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येची समस्या वाढत आहे. गेल्या दहा वर्षात हजारो शेतकऱ्यांनी कर्जबाजारी, गरीबी, दारिद्रय व सावकारांच्या छळास कंटाळुन आत्महत्या केल्या आहेत.

वाढत्या लोकसंख्येमुळे जमीनीचे विभाजन व तुकडीकरण होत आहे. त्यामुळे कमी शेतीवर जास्त लोकांना अवलंबुन रहावे लागत आहे. महाराष्ट्रात वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारीची समस्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शेतीत पुरेशा प्रमाणावर उत्पादन होत नसल्याने ग्रामीण लोक कामधंदा मिळेल या आशेने शहराकडे स्थलांतरित होत आहेत. त्यामुळे राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपुर, औरंगाबाद सारख्या महानगरात झोपडपट्टीचा प्रश्न गंभीर बनला आहे. औद्योगिकरणामुळे राज्यातील मुंबईसह अनेक शहरांचा विकास

झाला आहे. शहरांचा आकार वाढत आहे, लोकसंख्याही वाढत आहे, या वाढत्या लोकसंख्येमुळे स्थानिक प्रशासनाला जनतेला सर्व सोयी-सुविधा देण्यात अडचणी निर्माण होत आहेत. सद्यस्थितीत राज्यातील विविध शहरामंध्ये वाहतुक, पाणी पुरवठा, रोजगाराची उपलब्धता, शैक्षणिक सोयी-सुविधा पुरविण्या- संदर्भातील अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. शहरांबरोबरच ग्रामीण भागातही गुन्हेगा-री, बालगुन्हेगारी, महिलांवरील अत्याचारांच्या संख्येत वाढ होत आहे. दररोज खून, हाणामारी, विनयभंग, बलात्कार, भ्रष्टाचार यासारख्या घटनांच्या बातम्यांनी वृत्तपत्रांचे रकानेच्या-रकाने भरुन येत आहेत. महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण भागात कौटुंबिक हिसांचाराच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्था, हुंडाप्रथा, स्त्रियांचे आर्थिक परावलंबन, पुरुषांची व्यसनाधिनता इत्यादी कारणे कौटुंबिक हिसांचाराला कारणीभुत ठरत आहेत. महाराष्ट्रात दहशतवादी कारवायांचे प्रमाण अलीकडे मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बॉम्बस्फोट, अतिरेकी हल्ले इत्यादींमुळे जनता असुरक्षीत झाली आहे.

महाराष्ट्रात औद्योगीकरणाला चालना देण्याच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. विशेष आर्थीक क्षेत्राची स्थापना केली जात आहे, शेतकऱ्यांच्या जमीनी जबरदस्तींने कारखानदारांना कवडी मोल भावात दिल्या जात आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांना भूमीहिन होण्याची वेळ महाराष्ट्रात आली आहे. त्यांच्या योग्य पुन:र्वसनाचा प्रश्नही गंभीर होत आहे. शासन जनतेसाठी विविध कल्याणकारी योज-नांच्या घोषणा करते परंतु त्याची पुर्तता मात्र वर्षानुवर्ष होत नाही, अशा स्थितीत महाराष्ट्रातील जनता आपला जीव मुठीत धरुन जिवन जगत आहे.

**उपाययोजना:-**

महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्येच्या समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावरुन सातत्याने प्रयत्न सुरु असून राज्य सरकार केंद्र शासनाच्या व इतर संस्थांच्या मदतीने राज्यातील समस्या सोडविण्याचा प्रयत्न करत आहे. राज्यातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी विविध सिंचन प्रकल्प, कालवे, जलाशये, तुषार व ठिबक सिंचन योजना, कृषी पंपांना वीज अनुदान, कृषी पंपांचे विद्युतीकरण, सुधारीत बिया-णांचे वितरण, रासायनिक खतांचे वितरण, रासायनिक व जैविक किटकनाशकांचे वितरण, राष्ट्रीय कृषि विकास योजना, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, अन्न सुरक्षा अभियान, मृद व जलसंधारण, सेंद्रीय शेती, कृषि वित्तपुरवठा, किसान क्रेडिट कार्ड योजना, किमान आधारभुत किंमत योजना, कृषि विमा योजना, पशुसंवर्धन, कृत्रिम रेतन, कुक्कुट पालन दुग्ध विकास, मत्स्य व्यवसाय, रेशीम उत्पादन इत्यादीच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत.

महाराष्ट्रातील लोकसंख्येला जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून इ.स. १९९१ ते २०१२ या कालावधीत ९,५५,३२९ कोटी रुपयें गुंतवणूकीच्या १७,८६६ औद्योगिक प्रस्तावांना मान्यता दिली आहे, यामधून आतापर्यंत ९.५ लाख रोजगार निर्मीती झाली आहे.

शिक्षण क्षेत्रातील विकासासाठी बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार शासन प्रयत्न करत आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या घरापासून १.५ कि.मी. अंतराच्या आत प्राथमिक शाळा सुरु केल्या आहेत.

मुलींना इयत्ता १२ वी पर्यंत मोफत शिक्षण दिले जात आहे. राज्यात उच्च शिक्षण देण्यासाठी एकूण २० विद्यापीठे कार्यरत आहेत. त्यामध्ये चार कृषि विद्यापीठे, एक आरोग्य विज्ञान विद्यापीठ, एक पशुवैद्यक विद्यापीठ, एक तंत्रज्ञान विद्यापीठ व १३ सर्वसाधारण विद्यापीठांचा समावेश आहे. या विविध विद्यापीठांमध्ये व त्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षण संस्थांमध्ये आज लाखो विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत.

सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही राज्य सरकार विविध योजना राबवित आहे. राज्यात सद्यस्थितीत ५५३ जिल्हा-उपजिल्हा रुग्णालये, १८११ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १०,५८० आरोग्य उपकेंद्रांच्या माध्यमातून राज्यातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली जात आहे. स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तरात वाढ व्हावी म्हणून गर्भलिंग निदान, अनधिकृत गर्भपात, भृणहत्या या विषयी कडक कायदे

करण्यात आले आहेत. दारिद्र्य निर्मुलनासाठी समाजकल्याण व इतर विभागांच्या वतीने विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे.

**निष्कर्ष :-**

१. महाराष्ट्रातील अज्ञान, अंधश्रद्धा लोकसंख्या वाढीस कारणीभुत आहे.

२. लोकसंख्येच्या अमर्याद वाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली आहे.

३. लोकसंख्या वाढीचा परिणाम राज्याच्या विकासावर झाला आहे.

४. महाराष्ट्रातील जनतेचा दैववादी दृष्टीकोन व पारंपारिक विचारसरणी कुटुंब नियोजन कार्यक्रमात अडथळा ठरत आहे.

५. राज्यातील समस्या वाढविण्यात राजकिय नेतृत्व काही प्रमाणात कारणीभूत ठरत आहे.

**समारोप :-**

महाराष्ट्राच्या निर्मीतीपासूनच राज्यातील जनतेला विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. राज्यातील लोकसंख्येच्या समस्या विविध प्रकारच्या आहेत. या सर्व समस्यांचे निराकरण करणे, समूळ उच्चाटन करणे हे फक्त एकट्या शासनाचे काम नाही तर शासनाच्या बरोबरीने राज्यातील जनतेने एकत्रित येऊन विविध समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. जनतेचा पुढाकारच महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या समस्यांचे निर्मुलन करु शकेल यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ:-**

१) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, डॉ. अनिल कठारे, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

२) महाराष्ट्र प्रशासनाची रुपरेषा, डॉ. प्रीती पोहेकर, प्रा. दत्तात्रय खरटमोल, प्रा. गंगा भुतडा, अरुणा प्रकाशन, लातुर.

३) लोकसंख्या आणि समाज, डॉ. तारा कानिटकर, डॉ. सुधा काळदाते, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

४) लोकसंख्या आणि समाज, प्रा.लीला शिंदे, प्रा.डॉ. लता चौधरी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

५) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी: २०१२-१३, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

६) www.mpsckatta.org